शिक्षक दिन साजरा

चांदवड येथील आबड कला, लोढा वाणिज्य व जैन विज्ञान महाविद्यालयात इतिहास विभागाने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी स्वीकारले. या कार्यक्रमात सुरेश पाटील यांनी समाजामध्ये असणारी शिक्षकाची भूमिका विशद केली.भारताच्या जागतिक महासत्तेकडे वाटचालीच्या भूमिकेमध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. आदर्श नागरिक घडवण्यात देखील त्यांची महत्त्वाची भूमिका असते असे त्यांनी प्रतिपादन केले. या प्रसंगी अश्लेशा जाधव, भावना जाधव, योगिता पवार ,दुर्गेश गोसावी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केली. या कार्यक्रमाला प्रा. नितीन जैन ,प्रा.किशोर अहिरे उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हर्षदा आहेर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजक इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. संदीप पगार यांनी आभार व्यक्त केले.




शिक्षक दिन